| | | |
|---|---|---|
| **MHNB090003452025** | दाखल दिनांक : | ०३.०५.२०२५ |
| | नोंदणी दिनांक : | ०३.०५.२०२५ |
| | निकाल दिनांक : | ३०.०७.२०२६ |
| | कालावधी : | ०१ व. ०२ म. २७ दि. |

## <u>तळोदा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जि. नंदुरबार यांचे न्यायालय</u>

## (पिठासीन अधिकारी डी. डी. माने)

**फौजदारी किरकोळ अर्ज क्रं. २५/२०२५** **निशाणी क्र.४९.**

१. आफरीन शहेजादखान कुरैशी,
(लग्नापूर्वीचे नाव आफरीनबी मुखतारखा कुरैशी)
वय– २४ वर्ष, धंदा– घरकाम,
२. शहेबाज शहेजादखान कुरैशी,
वय– २ वर्ष, धंदा– काहीनाही,
(क्र. २ अज्ञान तर्फे अर्जदार क्र. १ अ.पा.क.)
दोन्ही रा. मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक .
ह. मु. रमनलाल नगर, तळोदा, ता. तळोदा, जि. नंदुरबार. **...अर्जदार**

**––विरुध्द –**

शहेजादखान खलीलखान कुरैशी,
वय –२७ वर्षे, व्यवसाय – व्यापार,
रा. मोमीनपुरा, भांगारची दुकान, वरली रोड,
फैजान ए मदीना मस्जीद जवळ, मालेगाव,
ता. मालेगाव, जि. नाशिक **... गैरअर्जदार**

---

**प्रकरण– कलम १४४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अन्वये**

---

अर्जदारातर्फे वकील – श्री.एम. एन. पठाण.
गैरअर्जदारातर्फे वकील– श्री.ए. ए. रेहमान.

---

**न्या य नि र्ण य**
**(पारीत दिनांक ३० जुलै, २०२६)**

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १४४ अन्वये त्यांना एकुण एकत्रित रुपये २५,०००/– प्रतिमहा पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. **अर्जदारांचे कथन थोडक्यात असे आहे की,**

अर्जदार क्रं. १ व गैरअर्जदार यांचे लग्न दि. २४.०२.२०२१ रोजी तळोदा येथे मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाले. त्यांना लग्न संबंधातून एक मुलगा नामे शहेबाज अर्जदार क्र. २ हा जन्माला आला. त्यांचे लग्न आजतागायत अस्तीत्वात आहे. लग्नामध्ये अर्जदार क्र. १ हिच्या आई वडीलांनी सोन्याचे व चांदीचे दागिने, कपडे व संसार उपयोगी वस्तू दिल्या होत्या. लग्नामध्ये सर्व मिळून रक्कम रू. ४,००,०००/– असा खर्च अर्जदार क्र. १ च्या आई वडीलांनी केला होता. त्यांनी लग्नामध्ये गैरअर्जदाराला चांदीची अंगठी, कपडे केले होते. तर, गैरअर्जदाराने चांदीचे व सोन्याचे

दागिने अर्जदार क्र. १ हिला दिले होते. अर्जदार क्र. १ हिचा भाऊ नवाजखान याचे लग्न गैरअर्जदाराची बहिण यासमीन हिच्याशी झाले आहे.

३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे कि, लग्नानंतर अर्जदार मालेगाव येथे नांदण्यास गेली. तिच्या सासरी सासु सासरे, नणंद व दिर असे सोबत राहत होते. लग्नानंतर आठ दिवसांनी गैरअर्जदार यांनी लग्नामध्ये चांगला हुंडा मिळाला नाही व मानपान केला नाही असे सांगून अर्जदार क्र. १ हिला मारझोड करण्यास सुरूवात केली. तसेच, त्याने अर्जदार क्र. १ हिला आई वडीलांकडून पिकअप गाडी घेण्याकरीता रक्कम रू. ५,००,०००/– आणण्यास सांगितले. तसेच, गैरअर्जदार याच्या आई वडीलांनी देखील ''हुंडा कमी दिला व सामान चांगले दिले नाही'' असे म्हणून अर्जदार क्र. १ हिला टोमणे मारले. रक्कम रू. ५,००,०००/– ची मागणी पुर्ण न केल्यामुळे गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ हिला उष्ट जेवण देत असे. तसेच, तिला दिवस रात्र काम लावत असे. सदर त्रासाबद्दल अर्जदार क्र. १ हिने तिच्या आई वडीलांना सांगितले. अर्जदार क्र. १ हिच्या वडीलांनी धंदा करण्यासाठी ठेवलेले व इतर नातेवाईकांना कडून जमवून रक्कम रू. ५,००,०००/– गैरअर्जदाराला दिले.

४. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे कि, लग्नानंतर दोन वर्षापर्यंत अर्जदार क्र. १ हिला मुल बाळ न झाल्यामुळे गैरअर्जदार व त्याचे आई वडील अर्जदार क्र. १ हिला ''वांझ'' असे म्हणत होते. तसेच, ते गैरअर्जदाराला ''दुसरे लग्न करून घे'' म्हणून

सांगत होते. तरीही भविष्याचा विचार करून अर्जदार क्र. १ सर्व सहन करत राहिली. दोन वर्षानंतर अर्जदार क्र. १ हि गरोदर राहिली. तिची प्रकृती बरी नसल्यामुळे तिने दवाखाण्यात दाखविले असता डॉक्टरांनी तिला आराम करण्यास सांगितले. अर्जदार क्र. १ चे वडील व काका अर्जदार क्र. १ हिला घेण्याकरीता आले असता गैरअर्जदाराने व त्याच्या घरच्यांनी त्यांना अपमानित केले व अर्जदार क्र. १ ला माहेरी पाठवून दिले.

**५.** अर्जदारांचे पुढे असे कथन आहे कि, दि. १८.०६.२०२३ रोजी शहादा येथील आदित्य हॉस्पीटल मध्ये अर्जदार क्र. २ चा जन्म झाला. त्याचा संपूर्ण खर्च अर्जदार क्र. १ च्या आई व भावांनी केला. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदारास मुलगा झाल्याबाबत कळविले होते. परंतु, तो मुलाला पाहण्यासाठी आला नाही. मुलाच्या जन्मानंतर धार्मिक कार्यक्रमाकरीता देखील गैरअर्जदार हा आला नाही. त्यानंतर अर्जदार क्र. १ चे वडील अपघातात मयत झाल्यामुळे तो त्याच्या कुटुंबा सहित आला. परंतु, दुःखाच्या प्रसंग देखील त्याने अर्जदार क्र. १ सोबत भांडण केले.

**६.** अर्जदारांचे पुढे असे कथन आहे कि, त्यानंतर ऑक्टोबर २०२३ मध्ये अर्जदार क्र. १ तिचा भाऊ, समाज पंच व इतर नातेवाईकांनी अर्जदार क्र. १ हिला का नांदवत नाही यासाठी पंच बैठक बसविली. सदर बैठकित देखील गैरअर्जदार व त्याच्या इतर नातेवाईकांनी अर्जदार व तिच्या कुटुंबियांशी भांडण केले व नाराजगीने अर्जदार क्र.

१ हिला घेऊन गेले. अर्जदार क्र. १ हि पुन्हा नांदायला गेली तरी देखील गैरअर्जदारांनी पुर्वी प्रमाणे त्रास देण्यास सुरूवात केली तसेच, रक्कम रू. ५,००,०००/– ची मागणी केली. अर्जदार क्र. १ हिने वडील वारल्यामुळे पैसे देण्यास असमर्थतः दर्शविली. त्यावेळी गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिला शिवीगाळ करून मारझोड केली. गैरअर्जदार याचे आई वडील गैरअर्जदाराला प्रोत्साहन देत होते. गैरअर्जदार अर्जदार क्र. १ हिला मारझोड करणे, उपाशी ठेवणे, कोणीशीही बोलू न देणे, घरामध्ये बंद करून घराच्या बाहेर जाणे अशा विविध प्रकारे त्रास देत असे. अर्जदार क्र. १ हिने सदर गोष्ट आई व भाऊ यांना सांगितली असता जुलै २०२४ मध्ये मालेगाव येथे पंच बैठक बसविली. सदर बैठकित गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ हिच्या भावाला मारण्याचा प्रयत्न केला तसेच, त्यांच्या नातेवाईकांना धमकि दिली. अर्जदार क्र. १ हिला मारहाण केली. पंच यांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला  परंतु, काही एक उपयोग झाला नाही. त्याने अर्जदाराचे स्त्रीधन, सोन्या चांदीचे दागिने हिसकवून घेतले. त्यांनतर त्यांनी अर्जदारांना व नातेवाईकांना हकलून दिले. भविष्याचा विचार करून अर्जदार क्र. १ हिने पोलिस स्टेशन येथे तक्रार न देता तळोदा येथे आली. त्यानंतर देखील गैरअर्जदाराने अर्जदारांची चौकशी केली नाही.

७. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे कि, गैरअर्जदाराने चौकशी न केल्यामुळे अर्जदार क्र. १ हिने महिला दक्षता केंद्र, नंदुरबार येथे दि. ०८.१०.२०२४ रोजी अर्ज

दिला. त्यांनतर अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये समजोता होऊन दि. ३१.१२.२०२४ रोजी अर्जदार क्र. १ हि नांदावयास गेली. परंतु, तिला पुर्वी प्रमाणे रक्कम रू. ५,००,०००/– च्या मागणी करीता त्रास गैरअर्जदाराने दिला. अर्जदार क्र. १ हिचे काका व भाऊ दि. ०२.०४.२०२५ रोजी अर्जदार क्र. १ हिच्या सासरी गेले व गैरअर्जदाराला त्रासाबाबत विचारणा केली. त्यावेळी गैरअर्जदाराने बेजबाबदारपणे उत्तर देऊन शिवीगाळ केली. तसेच, रक्कम रू. ५,००,०००/– देणार नाही तोपर्यंत चांगले वागविणार नाही असे सांगितले. त्याने अर्जदारांना घरातून हकलून दिले. माहेरी आल्यानंतर परत दि. ०८.०४.२०२५ रोजी अर्जदार क्र. १ हिने महिला दक्षता केंद्र, नंदुरबार येथे अर्ज दाखल केला. गैरअर्जदाराचे वागणे पाहून अर्जदार क्र. १ हिला खात्री झाली कि, गैरअर्जदार व त्याचे नातेवाईक तिला व्यवस्थीत नांदविणार नाही.

८. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे कि, अर्जदार क्र. १ हि सुशिक्षीत नाही. तसेच, ती कुठेहि कामधंदा करीत नाही. ती स्वतः व अर्जदार क्र. २ चे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. ती सध्या आई व भाऊ यांच्या आश्रयाने जीवन जगत आहे. याउलट, गैरअर्जदार याचे मालेगाव येथे स्वतःचे घर आहे. गैरअर्जदार याची स्वतःची भंगारची दुकान असून तो त्यातून महिन्याकाठी रक्कम रू.२,००,०००/– नफा कमवितो. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदारांना दरमहा एकत्रित रुपये २५,०००/– पोटगी सहज देऊ शकतो. सबब अर्जदारांचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

९. गैरअर्जदाराला या प्रकरणाची नोटीस काढली होती. गैरअर्जदार याने त्याचे म्हणणे नि.क्रं.१३ वर दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्याने त्याच्या विरुद्ध लावलेले आरोप फेटाळेले आहेत. त्याने नातेसंबंध मान्य केले आहेत. त्याचे असे म्हणणे आहे कि, अर्जदार क्र. १ हि स्वतःहून माहेरी राहत आहे. ती गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबीयांशी उध्दटपणे आणि असहकार्याने वागत असे. ती सासरचे घरकाम करण्यास टाळाटाळ करत असे. अर्जदार क्र. १ हि नेहमी माहेरी राहण्याचा आग्रह करत असे. अर्जदार क्र. १ हि सहा महिन्याच्या कालावधीपेक्षा जास्त काळ सासरी राहिली नाही. अर्जदार क्र.१ हिचे माहेरील नातेवाईकांशी अतिशय जवळचे संबंध आहेत. अर्जदार क्र. १ हिला सासरी नांदण्यापेक्षा माहेरी राहणे पसंद आहे. ती वैवाहिक कर्तव्याकडे दुर्लक्ष करते. तिने वैवाहिक जीवनात सहभाग घेण्यास नकार दिला. अर्जदार क्र. १ हिने सासर कडील लोकांशी प्रेमाचे संबंध ठेवले नाही. तसेच, अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदार याच्या कुटुंबासोबत प्रकरण सलोख्याने सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. अर्जदार क्र. १ हिने घरातील जबाबदा-यांकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले. गैरअर्जदाराने सन २०२३ व २०२४ मध्ये बैठक झाल्याचे मान्य केले आहे. तसेच, दि. १३.१२.२०२४ रोजी अर्जदार क्र. १ हि नांदायला आल्याचे देखील कबूल केले आहे.

१०. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन आहे कि, तो आजही अर्जदार हिला नांदवून घेण्यास तयार आहे. तो गरीब मजूर असून त्याची मालेगाव येथे भंगारची दुकान आहे.

त्यातून त्याला तुटपूंजी कमाई होते. त्यामुळे स्वतःचा व त्याच्या परिवाराचा उदरनिर्वाह करणे त्याला कठिण झाले आहे. याउलट, अर्जदार क्र. १ हि शिलाईचे काम करते. त्यातून ती तिचा व अर्जदार क्र. २ चा उदरनिर्वाह करू शकते. ती स्वतःच्या मर्जीने माहेरी राहत आहे. त्यामुळे ती कोणत्याही प्रकारची पोटगी मागण्यास पात्र नाही. शेवटी त्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**११.** वरील हकीकतेनुसार खालील मुद्दे निश्चीत करण्यात आले व त्यांची कारणमिमांसेनुसार स्पष्टीकरण देऊन खालील निष्कर्ष देण्यात येतात.

| **अनुक्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार हे सिध्द करतात काय की, गैरअर्जदाराने अर्जदारांचा सांभाळ व पालनपोषण करण्याकरीता दुर्लक्षित करुन स्पष्ट इन्कार केला आहे ? | **होय.** |
| **२** | अर्जदार हे सिध्द करतात काय की, ते स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे ? | **होय.** |
| **३** | अर्जदार हे सिध्द करतात काय की, गैरअर्जदार स्वतंत्र पोटगी देण्यास ऐपतदार आहे ? | **होय.** |
| **४** | अर्जदार हे स्वतंत्र पोटगी मागण्याचे हक्कदार आहे काय ? | **होय.** |
| **५.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**१२.** अर्जातील कथन सिध्द करण्यासाठी अर्जदार क्रं. १ यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रं. १५ वर दाखल केले व साक्ष नोंदवली. तिने विवाह प्रमाणपत्र नि.क्र. १९ वर दाखल केले. तिने महिला दक्षता केंद्र नंदुरबार येथे दिलेल्या अर्जाच्या स्थळप्रती नि.क्र. २० व २१ वर दाखल केल्या आहेत. अर्जदारांनी त्यांचा पुरावा पुरसीस निशाणी क्रं. २५ दाखल करून बंद केला आहे.

**१३.** याउलट गैरअर्जदार यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रं. ३० वर दाखल केले आहे. त्याने गट क्र. ६१/१ प्लॉट नं. १५ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३३ दाखल केला आहे. त्याने गट क्र. ६१/१ प्लॉट नं. २५ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३४ दाखल केला आहे. त्याने गट क्र. ६१/१/११ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३५ दाखल केला आहे. त्याने गट क्र. ६१/१ प्लॉट नं. २३ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३६ दाखल केला आहे. त्याने एम. आर. आय रिपोर्ट नि.क्र. ३७ दाखल केला आहे. त्याने डॉक्टरांनी दिलेले प्रिस्क्रीपशन नि.क्र. ३८ व ३९ वर दाखल केले आहेत. गैरअर्जदाराने त्याचा पुरावा पुरसीस निशाणी क्रं. ४३ दाखल करून बंद केला आहे.

### युक्तीवाद–

**१४.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारांचे विधिज्ञ एम. एन. पठाण यांनी असा युक्तीवाद केला कि, गैरअर्जदराने व त्याच्या

कुटुंबीयांनी अर्जदार क्र. १ हिला गाडी आणण्यासाठी रक्कम रू. ५,००,०००/– ची मागणी केली. सदर मागणी पुर्ण न झाल्यामुळे तसेच, लवकर मुलं बाळ न झाल्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिला शारिरीक व मानसिक त्रास दिला. अर्जदार क्र. १ हि गैरअर्जदाराला पसंद नव्हती. तो अर्जदार क्र. २ ला पाहण्याकरीता देखील आला नाही. त्याने वारंवार अर्जदारांना घरातून हकलून दिले. अर्जदार क्र. १ हिने महिला दक्षता केंद्र, नंदुरबार येथे अर्ज दिले. अर्जदार क्र. १ हिने नातेवाईकांच्या माध्यमातून पंच बैठका बसविल्या. तिने नांदण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. परंतु, गैरअर्जदाराने तिला नांदविले नाही. तिला विनाकारण त्रास दिला. त्यामुळे तिला गैरअर्जदारापासून वेगळे राहावे लागत आहे. ती कोणताही उद्योगधंदा करत नाही. याउलट, गैरअर्जदार हा धडधाकट असून भंगाराचा व्यवसाय करतो. त्याचे स्वतःचे भंगार दुकान आहे. त्यामुळे तो अर्जदारांना पोटगी देऊ शकतो. त्यांनी त्यांच्या समर्थनार्थ **संदिप वालिया विरूध्द मोनिका उपल्ल, मा. उच्च न्यायालय, दिल्ली फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. १७९/२०१९** मधील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. तसेच, त्यांनी **मुद्दसीर युसूफ खान विरूध्द शिरीन मुद्दसीर खान व इतर, मा. उच्च न्यायालय, बॉम्बे, खंडपीठ नागपूर फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. २६८/२०२२** मधील न्यायानिर्णयाचा आधार घेतला आहे.

**१५.** गैरअर्जदाराचे विधिज्ञ ए. ए. रेहमान यांनी असा युक्तीवाद केला कि, अर्जदाराने त्यांना गैरअर्जदाराने त्रास दिला हे दाखविण्याकरीता कोणताही साक्षीदार

तपासला नाही. गैरअर्जदार याने अर्जदारास कोणत्याही प्रकारचा त्रास दिला नाही. याउलट, अर्जदार हि नांदण्यास तयार नसून ती नेहमी माहेरी जाते. तिने सासरी असताना तिचे कर्तव्य कधीही पार पाडले नाही. जरी तिने तिच्या उलटतपासात नांदण्यास तयार आहे असे सांगितले तरी ती प्रत्यक्षात नांदण्यास तयार नाही. अर्जदार क्र. १ तर्फे सासरच्या घरा शेजारी राहणा–या व्यक्तीची साक्ष देण्यात आली नाही. जर तिला कोणत्याही प्रकारचा त्रास असता तर त्याबाबत घरा शेजारील व्यक्तींना नैसर्गिकतः माहिती असती. त्यामुळे त्यांनी घरा शेजारील साक्षीदार तपासणे क्रमप्राप्त होते. अर्जदाराने तिला मारहाण झाल्याबाबतचा वैदयकिय पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. तिने स्वतःहून गैरअर्जदाराचे घर सोडले आहे. ती स्वतःच्या मर्जीने तिच्या माहेरी राहते आहे. त्यामुळे ती पोटगीस पात्र नाही. तिच्या वडीलांकडे जमिन आहे. त्यातून तिला उत्पन्न मिळू शकते. ती स्वतः शिलाईचा व्यवसाय करू शकते व त्यातून स्वतःचा व अर्जदार क्र. २ चा उदरनिर्वाह भागवू शकते. त्यांनी त्यांच्या समर्थनार्थ **अभिलाशा पांडे विरूध्द नेमीचंद पांडे मा. उच्च न्यायालय, छत्तीसगड, विलासपुर, सी. आर. आर. नंबर ३४४/२०२६** मधील न्यायानिर्णयाचा आधार घेतला आहे.

**मुद्दा क्र. १ करीताः–**

**१६.** कलम १४४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतगर्त पोटगीची रक्कम मिळण्याकरीता अर्जदार क्र. ०१ ही गैरअर्जदाराची विधिवत लग्नाची पत्नी असणे

आवश्यक आहे. केवळ विधीवत पत्नीचे नाते उदरनिर्वाह भत्ता मिळविण्यास पुरेसे नसुन गैरअर्जदाराने अर्जदारांच्या पालन पोषणाकडे दुर्लक्ष केले याबाबतीत अर्जदारांनी पुरेसा पुरावा सादर केला आहे काय ही बाब पाहणे अत्यंत आवश्यक आहे. अर्जदार यांच्या शपथपत्रातील मजकुर हा त्यांच्या अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती आहे. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, गैरअर्जदाराने त्यांना केवळ काही दिवस चांगले नांदवले. त्यानंतर गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ हिला हुंडयाच्या कारणावरून शारीरिक व मानसिक त्रास देवुन लग्नामध्ये चांगल्या वस्तू दिल्या नाहीत यावरून वाद निर्माण करीत होते. तसेच पिकअप गाडी खरेदी करण्यासाठी माहेरहून रक्कम रुपये ५,००,०००/– आणण्याची गैरकायदेशीर मागणी करुन, मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी देखील देत होते. तुला मुलं बाळ होत नाही अशा प्रकारे बोलुन तसेच शिवीगाळ करुन अर्जदार क्र. १ चा छळ करीत होते.

**१७.** अर्जदार क्र. १ हि नेहमी घडलेला सर्व प्रकार माहेरच्या लोकांना सांगत होती. परंतु, आज ना उद्या संसार सुखाचा होईल या आशेवर ती संसार करत होती. तसेच, अर्जदार क्र. १ हिच्या माहेर कडील लोकांनी पंच बैठक बसवून गैरअर्जदाराची समजूत काढली. परंतु, गैरअर्जदार याच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. अर्जदार क्र. १ हिने महिला दक्षता केंद्र, नंदुरबार येथे अर्ज दिला होता. तेथे अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांच्या मध्ये तडजोड होऊन ती पुन्हा नांदावयास गेली होती. परंतु,

गैरअर्जदार याच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. त्याने तिला मारझोड करून पुन्हा घरातून हकलून दिले. ती वेगळी राहत असल्यापासून गैरअर्जदाराने तिची कोणतीही मदत केली नाही व विचारपुसही केली नाही. अर्जदार क्र. १ हिने उलटतपासात हे मान्य केले आहे कि, तिचे लग्न तळोदा येथील मस्जीद मध्ये झाले होते. मस्जीद मध्ये लग्नाचा खर्च येतो किंवा नाही हे तिला सांगता येणार नाही. गैरअर्जदाराला लग्नामध्ये वस्तू दिल्या हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा तिच्याकडे नाही. तिच्या घरच्यांनी गैरअर्जदाराला पैसे दिल्याची तारिख ती सांगू शकत नाही. तिच्या सासरच्या घरा शेजारी लोक वस्ती आहे. घरामध्ये घडलेली गोष्ट शेजा–याला कळू शकेल इतक्या जवळ घरे आहेत. पुढे ती असे कथन करते कि, तिला त्रास झाल्याबाबत कोणीही पाहिले नाही. पुढे तिने हे मान्य केले कि, गैरअर्जदाराने तिला नांदायला येण्याकरीता नोटीस पाठविली होती. तिने नोटीसीला उत्तर दिले होते व ती नांदायला देखील गेली होती. तिने संसार जुळविण्याकरीता कायदेशीर अर्ज केला नाही. गैरअर्जदार यांच्या बहिणीचे लग्न झाले असून त्या त्यांच्या घरी राहतात. तिचे सासू सासरे आजारी राहतात व त्यांच्या गोळया औषधांकरीता खर्च येतो. या व्यतिरीक्त विचारण्यात आलेल्या सर्व सुचनांना त्यांनी नकारात्मक उत्तरे दिली आहेत.

१८. अर्जदारांच्या पुराव्यावरून तिला सासरी त्रास होत असल्याचे दिसून येते. तिच्या उलटतपासा दरम्यान कोणतीही कबूली नाही. ज्यावरून असे दिसून येईल कि,

ती विनाकारण गैरअर्जदारापासून वेगळी राहत आहे. गैरअर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला कि, अर्जदार क्र. १ हिने तिला सासरी होणारा त्रास दाखविण्याकरीता सास–याच्या घराजवळील एकाही व्यक्तीची साक्ष नोंदविली नाही. परंतु, अर्जदाराच्या कथनाप्रमाणे तिला झालेला त्रास हा चार भिंतीच्या आतील असून सदर त्रासाबद्दल शेजारील व्यक्ती दरवेळेस साक्षी करीता येतील असे नाही. तसेच, तिने तिच्या उलटतपासात असे कथन केले आहे कि, तिला त्रास झाल्याबाबत कोणीही पाहिले नाही. त्यामुळे मला गैरअर्जदाराच्या युक्तीवादामध्ये तथ्य दिसून येत नाही.

**१९.** गैरअर्जदाराच्या विधिज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला कि, अर्जदार क्र. १ हि विनाकारण स्वतःच्या मर्जीने माहेरी राहत आहे. परंतु, अभिलेखावरील पुराव्यावरुन असे म्हणता येणार नाही की, अर्जदार क्र. १ ही विनाकारण तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदाराच्या मानसिक व शारिरीक त्रासाला कंटाळुन ती तिच्या माहेरी राहत आहे. माझ्या मते हे कारण तिला तिच्या पतीपासून वेगळे राहण्यासाठी समपर्क कारण आहे. इथे हे नमूद करणे गरजेचे आहे कि, कुठलीही भारतीय स्त्री कुठलेही संयुक्तीक कारण नसताना स्वतःच्या मर्जीने एका मुलासह पतीचे घर सोडून माहेरी राहणार नाही.

**२०.** तसेच, गैरअर्जदाराने त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये सन २०२३ व २०२४ मध्ये बैठक झाल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्याने अर्जदार क्र. १ हिने महिला दक्षता केंद्र, नंदुरबार येथे अर्ज केल्याचे देखील नाकारले नाही. त्यांनी त्यांच्या लेखी

म्हणण्यामध्ये अर्जदारांना दि. १३.१२.२०२४ रोजी नांदावयाला नेल्याचे कबूल केले आहे. यावरून हे दिसून येते कि, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांच्यामध्ये संबंध चांगले नव्हते. त्यामुळे त्यांना पंचासमक्ष बैठक घ्यावी लागली. तसेच, अर्जदार क्र. १ हिला महिला दक्षता केंद्र, नंदुरबार येथे अर्ज दाखल करावा लागला. यासर्व वस्तुस्थिती वरून असे दिसून येते कि, अर्जदार क्र. १ हि विनाकारण गैरअर्जदाराला सोडून राहत नाही.

**२१.** गैरअर्जदारांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला कि, गैरअर्जदाराने अर्जदारांचा सांभाळ व पालनपोषण करण्यास दुर्लक्ष केले नाही. परंतु, अर्जदार हि विनाकारण त्याला सोडून माहेरी राहत आहे. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १४४ (४) प्रमाणे जर एखादी स्त्री कोणतेही संयुक्तीक कारण नसताना पतीस सोडून राहत असेल तर ती पोटगीस पात्र नाही. त्यांनी त्यांच्या या युक्तीवादाच्या समर्थनार्थ **अभिलाशा पांडे विरूध्द नेमीचंद पांडे मा. उच्च न्यायालय, छत्तीसगड, विलासपुर, सी. आर. आर. नंबर ३४४/२०२६** मधील न्यायानिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायानिर्णयाचे अवलोकन केले असता हे दिसून येते कि, त्या प्रकरणामध्ये अर्जदार हि तिच्या दोन मुलांना गैरअर्जदाराकडे सोडून गैरअर्जदार तसेच, तिच्या आई वडीलांना न सांगता मनिष यादव व तिची बहिण नम्रता यांच्या सोबत दिल्ली येथे गेली होती. तिथे ती दहा ते बारा दिवस राहिली. दरम्यानच्या काळात तिच्या वडीलांनी ती हरविल्याबाबत पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. यापरिस्थीतीमध्ये मा. उच्च न्यायालयाने अर्जदार

तिच्या मर्जीने गैरअर्जदारापासून वेगळी झाली असा निष्कर्ष नोंदविला आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थीती आणि वर नमुद प्रकरणातील वस्तुस्थीती या वेगवेगळया असून गैरअर्जदारास सदर न्यायानिर्णयाचा फायदा होणार नाही.

२२. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १४४ (४) प्रमाणे जर एखादी स्त्री कोणत्याही रास्त कारणाशिवाय तिच्या पतीपासून वेगळी राहत असेल तर ती नक्कीच पोटगीस पात्र नाही. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये वर केलेल्या चर्चेप्रमाणे गैरअर्जदाराने हे दाखवून दिले नाही कि, अर्जदार हि कोणतेही रास्त कारणाशिवाय वेगळी राहत आहे. याउलट, उपलब्ध पुराव्यावरून हे दिसून येते कि, तिला पती पासून वेगळे राहण्याकरीता पुरेसे कारण आहेत.

२३. गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांनी असा देखील युक्तीवाद केला कि, गैरअर्जदार अर्जदारास नांदविण्यास तयार आहेत. परंतु, अर्जदार हि नांदायला तयार नाही. येथे हि बाब नमूद करणे गरजेचे आहे कि, फक्त नांदवायला तयार आहे असे म्हणणे पुरेसे नाही. तर व्यवस्थीतरित्या नांदविणे हे देखील गरजेचे आहे. अर्जदारांच्या विधिज्ञांनी अभिलेखावरती **मुद्दसीर युसूफ खान विरूध्द शिरीन मुद्दसीर खान व इतर, मा. उच्च न्यायालय, बॉम्बे, खंडपीठ नागपूर फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. २६८/२०२२** मधील न्यायानिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय यांनी असा निर्वाळा दिला आहे कि, केवळ गैरअर्जदार अर्जदारांना

नांदविण्यास तयार आहेत असे म्हणणे हे अर्जदाराने कोणत्याही पुरेशा कारणाशिवाय त्याची साथ सोडली हे भासवून पोटगी देण्याच्या दायित्वातून स्वतःला मुक्त करण्यासाठी पुरेसे कारण नाही. वरील नमूद न्यायानिर्णयानुसार गैरअर्जदार फक्त नांदवायला तयार आहेत असे म्हणून हे दाखवून देऊ शकत नाही कि, अर्जदार पुरेशा कारणाशिवाय त्याला सोडून राहता आहे.

२४. अर्जदारांनी दिलेल्या पुराव्यावरून हे स्पष्ट होते कि, अर्जदार माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदाराने त्यांच्या उदरनिर्वाहाची कुठलीही सोय केलेली नाही. तसेच, गैरअर्जदाराचे देखील असे म्हणणे नाही कि, त्याने अर्जदारांच्या पालनपोषणाची सोय केली आहे. गैरअर्जदाराने उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे कि, अर्जदारांची जबाबदारी आज देखील त्याच्या वरती आहे. अशा परिस्थीतीमध्ये उपरोक्त सर्व उहापोहावरून माझे असे मत झाले आहे कि, गैरअर्जदाराने अर्जदारांचा ते अर्जदार क्र. १ च्या माहेरी राहत असल्यापासून त्यांचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली व त्यांचा निर्वाह करण्यास त्याने नकार दिला आहे. म्हणून मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीताः</u>–**

२५. अर्जदार क्र. १ ने तिच्या शपथपत्रात स्पष्ट साक्ष दिली आहे की,

तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ती अशिक्षीत आहे. त्यामुळे ती तिचा व अर्जदार क्रं.२ चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदाराने त्याच्या लेखी म्हणण्यामध्ये असे नमूद केले आहे कि, गैरअर्जदार शिलाई व्यवसाय करते व त्यातून तिला उत्पन्न मिळू शकते. तसेच, अर्जदार हिला तिच्या वडीलांच्या मालमत्तेमध्ये हिस्सा प्राप्त झाला आहे. त्यातून मिळणा–या उत्पन्नातून देखील तिचा व अर्जदार क्र. २ चा उदरनिर्वाह करू शकते. गैरअर्जदाराने अभिलेखावरती गट क्र. ६१/१ प्लॉट नं. १५ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३३ दाखल केला आहे. त्याने गट क्र. ६१/१ प्लॉट नं. २५ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३४ दाखल केला आहे. त्याने गट क्र. ६१/१/११ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३५ दाखल केला आहे. त्याने गट क्र. ६१/१ प्लॉट नं. २३ चा ७/१२ उतारा नि.क्र. ३६ दाखल केला आहे. सदर उता–यांवरून असे दिसून येते कि, अर्जदार क्र. १ चे वडील मुखतार खा कुरेशी यांच्या नावे तळोदा येथे प्लॉट आहेत. परंतु, गैरअर्जदाराने त्यामध्ये अर्जदार क्र. १ चा किती हिस्सा आहे. अथवा तिला त्यातून काय उत्पन्न मिळते याबाबत काहीही स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे गैरअर्जदार म्हणतो त्याप्रमाणे तिला वडीलांच्या मालमत्तेतून उत्पन्न आहे असे म्हणता येणार नाही.

**२६.** गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हि शिलाई काम करते व त्यातून तिला उत्पन्न मिळते असे दाखविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच, अर्जदार क्र. १ च्या उलटतपासात देखील त्याबाबत कोणतीही कबूली नाही.

याउपर, अर्जदार क्र. १ हि स्त्री आहे. अशा परिस्थीतीत जोपर्यंत सबळ पुराव्यानिशी हे सिध्द होत नाही कि, अर्जदार हि पालनपोषण करण्यास समर्थ आहे तोपर्यंत ती तिचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे असेच गृहित धरावे लागेल. त्यामुळे मी या मुद्दयाचा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ व ४ करीताः–**

**२७.** अर्जदारांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला कि, गैरअर्जदार हा भंगार खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो. त्याचे मालेगाव येथे स्वतःचे घर आहे. तसेच, मालेगाव येथे त्याचे स्वतःचे भंगारचे दुकान असून तो त्यातून दरमहा खर्च वजा करता रक्कम रू. २,००,०००/– कमवितो. गैरअर्जदार याचे भंगारचे दुकान असल्याची बाब गैरअर्जदाराने त्याच्या उलटतपासात व त्याच्या लेखी म्हणण्यामध्ये कबूल केली आहे. तसेच, गैरअर्जदाराचे वय २७ वर्षे असून तो शरीराने देखील सदृढ आहे. त्यामुळे तो कामधंदा करून उत्पन्न घेऊ शकतो. त्यामुळे तो अर्जदारांना पोटगी देण्यास ऐपतदार आहे. त्यांनी त्यांच्या समर्थनार्थ **संदिप वालिया विरूध्द मोनिका उपल्ल, मा. उच्च न्यायालय, दिल्ली फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. १७९/२०१९** मधील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असा निर्वाळा दिला आहे कि, जर गैरअर्जदार हा शरीराने सदृढ असेल तर तो त्याच्या पत्नीचा उदरनिर्वाह

करण्यास कायदेशीर बांधील आहे. पत्नीला आर्थिक सहाय्य करणे हे एक पवित्र कर्तव्य आहे. पतीकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही हा केवळ एक युक्तीवाद त्याला पत्नीच्या देखभालीच्या जबाबदारीतून मुक्त करण्यासाठी पुरेसा नाही.

२८. प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरअर्जदाराने त्याच्या लेखी म्हणण्यामध्ये तसेच, उलटतपासामध्ये तो भंगार दुकान चालवित असल्याचे कबूल केले आहे. त्यामुळे त्याला उत्पन्नाचे साधन आहे असे दिसून येते. त्यामुळे गैरअर्जदार हा स्वतंत्र पोटगी देण्यास ऐपतदार आहे. त्यामुळे गैरअर्जदाराचे उत्पन्न किती आहे हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदाराने गैरअर्जदार भंगार दुकानातून महिन्याकाठी रक्कम रू.२,००,०००/– उत्पन्न घेतो असे कथन केले आहे. परंतु, गैरअर्जदाराचे रक्कम रू.२,००,०००/– उत्पन्न असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अर्जदारांनी अभिलेखावरती दाखल केला नाही.

२९. गैरअर्जदाराने त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये त्याला भंगाराच्या दुकानातून रक्कम रू.२,००,०००/– उत्पन्न असल्याचे नाकारले आहे. परंतु, त्याने मोघमपणे त्याची कमाई तुटपुंजी आहे असे नमूद केले आहे. वास्तविकतः गैरअर्जदाराने त्याचे दुकान आहे हे कबूल केल्यामुळे त्याला त्यातून किती उत्पन्न होते हे त्याने अभिलेखावरती आणणे गरजेचे होते. परंतु, त्याने तसे केले नाही. उलटतपासात त्याने तो रक्कम रू. १००/– ते १५०/– रोज कमावितो असे कथन केले आहे. परंतु, त्याने

त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुरावा अभिलेखावरती दाखल केला नाही. गैरअर्जदार सहजपणे त्याच्या भंगार दुकानाचा लेखाजोखा दाखल करू शकला असता. जेणे करून त्याचे खरे उत्पन्न अभिलेखावरती आले असते. परंतु, गैरअर्जदाराने त्याचे भंगारचे दुकान असल्याचे व स्वतःचे घर असल्याचे कबूल केले आहे. यावरून असे दिसून येते कि, त्याचे उत्पन्न नक्कीच चांगले आहे.

३०. गैरअर्जदाराने त्याच्या आई वडीलांच्या डॉक्टरांनी दिलेल्या औषध गोळयांच्या पावत्या नि.क्र. ३८ व ३९ वरती दाखल केल्या आहेत. तसेच, अर्जदाराने उलटतपासात हे मान्य केले आहे कि, तिचे सासू सासरे आजारी असतात व त्यांच्या गोळयांना खर्च येतो. परंतु, सदर औषध गोळया त्याच्या आई वडीलांना नेहमी घ्याव्या लागतात का नाही याबाबत कोणतीही स्पष्टता सदर पावत्यांवरून येत नाही. तसेच, त्याबाबत किती खर्च येतो याची देखील स्पष्टता त्यावरून येत नाही. त्यामुळे गैरअर्जदाराच्या आई वडीलांचा किती खर्च आहे याबाबतची स्पष्टता अभिलेखावर नाही.

३१. प्रस्तुत प्रकरणातील तथ्य गैरअर्जदाराचे असलेले उत्पन्नाचे साधन हे लक्षात घेऊन तसेच, त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींचा विचार करून पोटगीची रक्कम ठरविणे गरजेचे आहे. तसेच, पोटगीची रक्कम ठरविताना ती आशारितीने ठरविणे आवश्यक आहे कि, अर्जदारांना त्यांच्या जिवनावश्यक गरजा भागविण्याकरीता ती पुर्ण

झाली पाहिजे. तसेच, त्या रकमेत त्यांचा उदरनिर्वाह व्यवस्थीतरित्या होईल. अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमान, गैरअर्जदार याच्या उत्पन्नाचे साधन व जिवनावश्यक वस्तूंच्या किंमती या सर्व बाबींचा विचार करता मला असे वाटते कि, अर्जदार क्र. १ ला दरमहा रक्कम रू. ४०००/– आणि अर्जदार क्र. २ ला दरमहा रक्कम रू. २०००/– पोटगी देणे न्यायोचित होईल. म्हणुन मुद्दा क्रं. ३ व ४ चे निष्कर्ष तसे नोंदवित आहे आणि मुद्दा क्रं. ५ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ ला दरमहा रक्कम रू. ४०००/– आणि अर्जदार क्र. २ ला दरमहा रक्कम रू. २०००/–इतकि रक्कम पोटगी म्हणून अर्ज दाखल दिनांक ०३.०५.२०२५ पासून दयावी.

३. गैरअर्जदाराने अर्जदारांना सदर अर्जाचा खर्च रुपये ५,०००/– दयावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये जाहीर करण्यात आला.

MANE DINESH DAGADU
Digitally signed by MANE DINESH DAGADU
Date: 2026.07.30 17:38:14 +0530

दिनांक –३०.०७.२०२६

**(डी. डी. माने)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,न्यायालय, तळोदा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | स्नेहा डी. जैन. |
| न्यायालयाचे नाव | : | डी. डी. माने,<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय, तळोदा |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ३०.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ३०.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ३०.०७.२०२६ |